# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 06.08.2025** **वार- बुधवार**

---

**<u>इथेनॉल</u>**

राज्य सरकारनं धान्यापासून इथेनॉल निर्मितीच्या धोरणास केंद्र सरकारप्रमाणंच नुकतीच मान्यता दिल्यानं इथेनॉल उत्पादनात वाढ होण्याची अपेक्षा आहे. राज्यात ऊस पिकाखालील सरासरी क्षेत्र 10 ते 11 लाख हेक्टरच्या आसपास असते. तर मक्याचं सरासरी क्षेत्र 9 लाख 33 हजार हेक्टर असलं तरी अलीकडील काही वर्षात हे क्षेत्र सतत वाढत आहे. यंदा मक्याची 13 लाख 84 हजार हेक्टर क्षेत्रावर उच्चांकी पेरणी पूर्ण झाल्याचं कृषी विभागाच्या ताज्या पेरणी अहवालावरून स्पष्ट झालं आहे, असं पुणे कृषी आयुक्तालयाचे मुख्य सांख्यिक वैभव तांबे यांनी सांगितलं.

**<u>शिष्टमंडळ</u>**

जागतिक पातळीवर लोकशाही संवाद बळकट करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, भारतीय विधिमंडळातील १३० हून अधिक सदस्यांचं एक शिष्टमंडळ ४ ते ६ ऑगस्ट दरम्यान अमेरिकेच्या बोस्टन शहरात सुरू असलेल्या नॅशनल कॉन्फरन्स ऑफ स्टेट लजिस्लेटर्स समिटमध्ये सहभागी झाले आहेत. या उपक्रमाची माहिती एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटचे डॉ. परिमल माया सुधाकर यांनी आज पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. या ऐतिहासिक सहभागासाठी नॅशनल

लेजिस्लेटर्स कॉन्फरन्स, भारत या मंचाने पुढाकार घेतला आहे. या शिष्टमंडळात देशभरातील २४ हून अधिक राज्यांमधून आलेले आमदार आणि विधान परिषदेचे सदस्य  सहभागी असून, हे प्रतिनिधी २१ वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे प्रतिनिधित्व करतात.

**संजीवनी**

भारतीय वैद्यकीय संघटनेच्या पुणे शाखेच्या वतीनं 'संजीवनी'   या उपक्रमाचा प्रारंभ करण्यात आला आहे. हा उपक्रम जीवनरक्षक तंत्रज्ञानाची प्रशिक्षण कार्यशाळा असून, यंदाच्या गणेशोत्सवात त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जाणार आहे. या उपक्रमांतर्गत वैद्यकीय विद्यार्थी तसंच ढोल-ताशा पथकातील वादक यांना प्राथमिक जीवनरक्षक तंत्रज्ञानाचं प्रशिक्षण अनुभवी डॉक्टरांतर्फे देण्यात येणार आहे. त्यात सीपीआर उपचारासोबत चक्कर येऊन बेशुद्ध पडणे, दमा, अपस्माराचा झटका यावरील प्राथमिक उपचारांचा समावेश आहे. या उपक्रमांतर्गत प्रशिक्षित स्वयंसेवक यंदाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत संजीवनी स्वयंसेवक म्हणून कार्यरत असतील.

**बारणे**

मुंबई-पुणे फास्ट ट्रॅक प्रकल्पाचं सर्वेक्षण करावं  आणि लोणावळा ते पुणे दुपारची लोकल सुरु करावी, थांबे पुन्हा सुरु करावेत,अशी मागणी खासदार श्रीरंग बारणे यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे. पिंपरी - मुंबई-पुणे फास्ट ट्रॅक हा प्रकल्प मुंबई-पुणे प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि प्रवाशांना सुलभ करणारा ठरणारा आहे. दोन्ही शहरांमधील वाढती वाहतूक आणि रेल्वेवरचा ताण लक्षात घेता, फास्ट ट्रॅक सेवा ही काळाची गरज आहे. तसंच पुणे-लोणावळा दरम्यान दुपारची लोकल आणि कोरोना काळात बंद केलेले थांबे पुन्हा सुरु करावेत, अशी मागणी बारणे यांनी केली आहे.

**<u>हयात</u>**

ज्येष्ठ नागरिक, विधवा आणि दिव्यांगांसाठी राबविल्या जाणाऱ्या केंद्रपुरस्कृत पेन्शन योजनांचा लाभ सुरू ठेवण्यासाठी दरवर्षी 'हयातीचं प्रमाणपत्र' सादर करणं बंधनकारक असतं. मात्र, ही प्रक्रिया वेळखाऊ, त्रासदायक आणि शारीरिकदृष्ट्या अडथळादायक ठरत होती. यामुळं केंद्र सरकारनं एक ॲप' तयार केलं आहे. या ॲपच्या मदतीनं 65 वर्षांवरील लाभार्थ्यांना मोबाईल कॅमेऱ्यात चेहरा दाखवून घरबसल्या डिजिटल हयातीचं प्रमाणपत्र सादर करता येणार आहे. या ॲपमुळे सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागांतर्गत केंद्रपुरस्कृत योजनांतील 65 वर्षांवरील लाभार्थ्यांना हयातीचं प्रमाणपत्र घरबसल्या सादर करता येणार आहे.

**<u>पास</u>**

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड अर्थात पीएमपीएमएल तर्फे शालेय तसंच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी फिरते पास केंद्र हा उपक्रम हाती घेतला आहे. मासिक पास सुविधा आता ठिकठिकाणच्या परिसरात प्राप्त होणार असून फिरत्या सुविधा केंद्रासाठी विशेष दिवसांचं नियोजन करण्यात आलं आहे. फिरते पास केंद्र दर सोमवार ते शनिवार सकाळी ७.३० ते दुपारी १.३० या वेळेत कार्यरत राहणार आहेत, अशी माहिती महामंडळाकडून देण्यात आली.

**<u>पुरस्कार</u>**

पिंपरीतील डॉक्टर डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि संशोधन केंद्राला अवयवदान आणि प्रत्यारोपणातील उत्कृष्ट कार्यासाठी "सर्वोत्कृष्ट बीएसडी पुरस्कार" आणि "सर्वोत्कृष्ट

अवयव प्रत्यारोपण समन्वयक पुरस्कार”  प्रदान करण्यात आला आहे. ही संस्था महाराष्ट्रातील ब्रेन-स्टेम-डेथ  टीम या श्रेणीतील सर्वोत्कृष्ट ठरली आहे.

**<u>कार्यशाळा</u>**

महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि एव्हीके पॉश सल्ला सेवा यांच्याद्वारे आयोजित कामाच्या ठिकाणी महिलांवरील लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, 2013 अर्थात POSH कायद्याविषयी  जनजागृती कार्यशाळा उद्या सकाळी दहा वाजता पुणे विद्यापीठाच्या इरावती  कर्वे सामाजिक शास्त्र संकुलात होणार आहे.

**<u>धनुर्विद्या</u>**

दिल्ली इथं विश्व धनुर्विद्या आशियामार्फत आंतरराष्ट्रीय पंच परीक्षा पार पडली. यामध्ये पुणे जिल्ह्यातील सोनल बुंदेले उत्तीर्ण झाल्या. ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या  त्या महाराष्ट्रातील पहिल्या पंच ठरल्या आहे. सोनाली यांनी अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग घेतला आहे तसंच त्या महाराष्ट्र राज्य धनुर्विद्या संघटनेच्या सहसचिव पदी कार्यरत आहेत.

**<u>डेंग्यू</u>**

डेंग्यू प्रतिबंधात्मक उपाययोजनांना गती देण्याच्या दृष्टीनं पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागानं उपाययोजना अधिक प्रभावीपणं राबवण्यास सुरुवात केली आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागानं डेंग्यू आणि मलेरिया यांसारख्या आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शहरभर धडक मोहीम सुरू केली आहे.

**चोरी**

पुणे महापालिका आयुक्तांच्या मॉडेल कॉलनी इथल्या निवासस्थानातील काही किंमती वस्तू नाहीशा झाल्याच्या प्रकरणाची गंभीरपणे चौकशी केली जाईल, असं पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी आज पत्रकारांना सांगितलं. आयुक्तांच्या सुसज्ज बंगल्यातून चार वातानुकूलित यंत्रणा, झुंबर, वॉकी टॉकी, पितळी दिवे यासह आणखी काही महत्त्वाच्या वस्तू नाहीशा झाल्याचा प्रकार काल उघडकीस आला.

**अंमली पदार्थ**

सीमाशुल्क विभागानं केलेल्या कारवाईत पुणे विमानतळावर बँकॉकवरून आलेल्या विमानातून मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ जप्त करण्यात आले असून, त्याची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किंमत सुमारे सहा कोटी रुपये असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. दरम्यान, पुणे पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकानं केलेल्या कारवाईत सुमारे २७ किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले असून त्याची किंमत साडेपाच लाख रुपये आहे. या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**